## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ येथिल शाळा क्रं.३४ जवळील फयुचीरीस्टीक क्लासरुम व लायब्ररी इमारतीचे नुतनीकरण करणे.**

उपरोक्त विषयांस अनुसरुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजने अंतर्गत महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३७/का.१४११ दि.०१/०७/२०२४ या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजनेअंतर्गत शासन निर्णय, नियोजन विभाग दिनांक २८ मार्च,,२०२२ मधील परिच्छेद ३ (ब) नुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका अंतर्गत वरील शासन निर्णयासोबत दिलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या रु.२५.०० कोटी एवढया किंमतीच्या कामांची थेट शासन स्तरावरुन निवड करण्यात आली आहे. सदर यादीतील अनु क्रं.१२ मध्ये विषयांकीत काम नमुद असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदर कामांस खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवुन शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी सो यांजकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी रक्कम रु.७४,९९,९५६/-(अक्षरी रु.चव-यात्तर लाख नव्यांनवद हजार नऊशे छप्पन रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.११/०७/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :-** ६०६ **दिनांक :-** ८/१० **/२०२४**

भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ येथिल शाळा क्रं.३४ जवळील फयुचीरीस्टीक क्लासरुम व लायब्ररी इमारतीचे नुतनीकरण करणे याकामी रु रु.७४,९९,९५६/-(अक्षरी रु.चव-यात्तर लाख नव्यांनवद हजार नऊशे छप्पन रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रु.७४,९९,९५६/-(अक्षरी रु.चव-यात्तर लाख नव्यांनवद हजार नऊशे छप्पन रु. मात्र) खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ येथिल शाळा क्रं.३४ जवळील फयुचीरीस्टीक क्लासरुम व लायब्ररी इमारतीचे नुतनीकरण करणे.**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७४,९९,९५५/- करिता ई-निविदा सुचना क्र.२०/२०२४-२५, टेंडर नं.१०५९९१५ दिनांक २६/०७/२०२४ ते ०२/०८/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि.०९/०८/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली असुन या कामी ४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक १९/०८/२०२४ रोजी दु.४.०४ मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र ४ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| **१** | **चंडीका कंन्स्ट्रक्शन, भिवंडी.** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५५ टक्के कमी दराने** | **७४,५८,३३०.३५** |
| २ | क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने | ७४,९९,२०५.१० |
| ३ | शिवलाल भिकाजी, मुंबई | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के जादा दराने | ७६,४९,९५४.२० |
| ४ | सुजित बाळासाहेब खरात, भिवंडी. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४५५ टक्के कमी दराने | ७४,६५,८३०.३० |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार **चंडीका कंन्स्ट्रक्शन, भिवंडी** यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५५ टक्के कमी दराने रक्कम रु. **७४,५८,३३०**/- (रुपये चौ-यात्तर लाख अठ्ठावन्न हजार तिनशे तीस मात्र) इतक्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ६०७ **दिनांक :-** ८/१० **/२०२४**

चंडीका कंन्स्ट्रक्शन, भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५५ टक्के कमी दराने रक्कम रु. ७४,५८,३३०/- (रु. चौ-यात्तर लाख अठ्ठावन्न हजार तिनशे तीस मात्र) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ येथिल शाळा क्रं.३४ जवळील फयुचीरीस्टीक क्लासरुम व लायब्ररी इमारतीचे नुतनीकरण करणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार चंडीका कंन्स्ट्रक्शन, भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**